PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sulavarchi poli
Year: 1980

Song: Payat Painjan
Lyricist: Rajesh, Anant Jadhav

पायात पैंजण पैंजणात घुंगरू
पायात पैंजण पैंजणात घुंगरू
घुंगराची तान अशी बोले
तान ऐकून मन माझं डोले
हो तान ऐकून मन माझं डोले
पायात पैंजण पैंजणात घुंगरू
घुंगराची तान अशी बोले
तान ऐकून मन माझं डोले
हो तान ऐकून मन माझं डोले

झुळूझुळू पाटाचं पाणी
ल ल ला
गात जाई मंजुळ गाणी
ल ल ला
दोघांविना नाही इथं कोणी
बिलगून चालूया रानी
हो झुळूझुळू पाटाचं पाणी
हो हो हो...
गात जाई मंजुळ गाणी
ओ हो हो...
दोघांविना नाही इथं कोणी
बिलगून चालूया रानी
आकाशाचं आंगण अंगणात पाखरं
आकाशाचं आंगण अंगणात पाखरं
पाखरांची किलबिल चाले

कुहूकुहू हळूच कुणी बोले
हो कुहूकुहू हळूच कुणी बोले

नागमोडी चढणीचा घाट
ल ल ला
अनोळखी ही पायवाट
ल ल ला
जाई आज तोल सारखा हा
धस्स् होई माझ्या काळजात
हो नागमोडी चढणीचा घाट
हो हो हो
अनोळखी ही पायवाट
ओ हो हो
जाई आज तोल सारखा हा
धस्स् होई माझ्या काळजात
मिठीचं कोंदण कोंदणात काया
मिठीचं कोंदण कोंदणात काया
कायेची पालखी डोले
आज माझी न मी राहीले
हो आज माझी न मी राहीले
पायात पैंजण पैंजणात घुंगरू
घुंगराची तान अशी बोले
तान ऐकून मन माझं डोले
हो तान ऐकून मन माझं डोले

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*